# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ ( १९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमक्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापण मंडळ )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३५२

जा. क्रं./गों.वि./परीक्षा विभाग/608/२०१९ दि. 05/03./२०१९

प्रती,

संलग्नित सर्व महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

विषय:–प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांची माहीती पाठविणेबाबत.

संदर्भ:–1. Under Secretary,Ministry of social Justice & Empowerment, New Delhi ),यांचे पत्र दि.29/08/2018.

२.मा.संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र दि.२८/११/२०१८.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाची उन्हाळी २०१९ ची परीक्षा दि. ०८/०४/२०१९ पासुन सुरू होत आहे. आपल्या महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांपैकी दिव्यांग विद्यार्थ्यांची माहीती विद्यापीठात दि. १५/०३/२०१९ पर्यंत सोबत संलग्नित Appendix I & II प्रपत्रानुसार सादर करावी. जेणे करून त्यानूसार विद्यार्थ्यांना लेखनिक उपलब्ध करून देणे,परीक्षेमध्ये नियमानुसार अधिकचे वेळ देणे,गुणांमध्ये सवलत देणे ईत्यादी प्रक्रीया करणे सोईचे होईल. दि. १५/०३/२०१९ नंतर याबाबत कोणतीही माहीती स्विकारण्यात येणार नाही व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

सहपत्र–वरीलप्रमाणे

5/3/2019

(डॉ.अनिल झेड.चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**F. No. 34-02/2015-DD-III**
**Government of India**
**Ministry of Social Justice & Empowerment**
**Department of Empowerment of of Persons with Disabilities (Divyangjan)**
***

Pt. Deendayal Antyodaya Bhawan,
C.G.O. Complex, New Delhi - 110003
Dated: the 29th August, 2018

## Office Memorandum

**Subject:** Guidelines for conducting written examination for Persons with Benchmark Disabilities

The undersigned is directed to say that this Department had issued the guidelines for conducting written examination for persons with disabilities defined in terms of erstwhile Persons with Disabilities (Equal Opportunities, Protection for Rights and Full Participation) Act, 1995 vide OM No. 16-110/2003-DD.III dated 26/02/2013. The Department had constituted a Committee under the Chairmanship of Secretary, DEPwD in March, 2015 to review the said guidelines based on the issues raised by Union Public Service Commission and others. Meanwhile the Central Government enacted the Rights of Persons with Disabilities Act, 2016 (RPwD Act, 2016 ) which came into force from 19.04.2017. The Act provides for reservation in Government jobs for persons with benchmark disabilities as defined under section 2 (r) of the said Act.

Based on the findings of the Committee, the Central Government hereby lays down the revised guidelines for conducting written examination for persons with benchmark disabilities in supersession of the earlier guidelines issued vide OM No. 16-110/2003-DD.III dated 26/02/2013 as under:

I. These guidelines may be called as "Guidelines for conducting written examination for persons with benchmark disabilities 2018".

II. There should be a uniform and comprehensive policy across the country for persons with benchmark disabilities for written examination taking into account improvement in technology and new avenues opened to the persons with benchmark disabilities providing a level playing field. Policy should also have flexibility to accommodate the specific needs on case-to-case basis.

III. There is no need for fixing separate criteria for regular and competitive examinations.

IV. The facility of Scribe/Reader/Lab Assistant should be allowed to any person with benchmark disability as defined under section 2(r) of the RPwD Act, 2016 and has limitation in writing including that of speed if so desired by him/her.

In case of persons with benchmark disabilities in the category of blindness, locomotor disability (both arm affected-BA) and cerebral palsy, the facility of scribe/reader/lab assistant shall be given, if so desired by the person.

In case of other category of persons with benchmark disabilities, the provision of scribe/reader/lab assistant can be allowed on production of a certificate to the effect that the person concerned has physical limitation to write, and scribe is essential to write examination on his behalf, from the Chief Medical Officer/Civil Surgeon/ Medical Superintendent of a Government health care institution as per proforma at **APPENDIX-I**.

V. The candidate should have the discretion of opting for his own scribe/reader/lab assistant or request the Examination Body for the same. The examining body may also identify the scribe/ reader/lab assistant to make panels at the District/Division/ State level as per the requirements of the examination. In such instances the candidates should be allowed to meet the scribe **two days** before the examination so that the candidates get a chance to check and verify whether the scribe is suitable or not.

VI. In case the examining body provides the scribe/reader/lab assistant, it shall be ensured that qualification of the scribe should not be more than the minimum qualification criteria of the examination. However, the qualification of the scribe/reader should always be matriculate or above.

In case the candidate is allowed to bring his own scribe, the qualification of the scribe should be one step below the qualification of the candidate taking examination. The persons with benchmark disabilities opting for own scribe/reader should submit details of the own scribe as per proforma at **APPENDIX-II**

VII. There should also be flexibility in accommodating any change in scribe/reader/lab assistant in case of emergency. The candidates should also be allowed to take more than one scribe/reader for writing different papers especially for languages. However, there can be only one scribe per subject.

VIII. Persons with benchmark disabilities should be given, as far as possible, the option of choosing the mode for taking the examinations i.e. in Braille or in the computer or in large print or even by recording the answers as the examining bodies

can easily make use of technology to convert question paper in large prints, e-text, or Braille and can also convert Braille text in English or regional languages.

IX. In case, the persons with benchmark disabilities are allowed to take examination on computer system, they should be allowed to check the computer system one day in advance so that the problems, if any in the software/system could be rectified. Use of own computer/laptop should not be allowed for taking examination. However, enabling accessories for the computer based examinations such as keyboard, customized mouse etc should be allowed.

X. The procedure of availing the facility of scribe should be simplified and the necessary details should be recorded at the time of filling up of the forms. Thereafter, the examining body should ensure availability of question papers in the format opted by the candidate as well as suitable seating arrangement for giving examination.

XI. The disability certificate issued by the competent medical authority at any place should be accepted across the country.

XII. The word "extra time or additional time" that is being currently used should be changed to "compensatory time" and the same should not be less than 20 minutes per hour of examination for persons who are allowed use of scribe/reader/lab assistant. All the candidates with benchmark disability not availing the facility of scribe may be allowed additional time of minimum of one hour for examination of 3 hours duration. In case the duration of the examination is less than an hour, then the duration of additional time should be allowed on pro-rata basis. Additional time should not be less than 5 minutes and should be in the multiple of 5.

XIII. The candidates should be allowed to use assistive devices like talking calculator (in cases where calculators are allowed for giving exams), tailor frame, Braille slate, abacus, geometry kit, Braille measuring tape and augmentative communication devices like communication chart and electronic devices.

XIV. Proper seating arrangement (preferably on the ground floor) should be made prior to the commencement of examination to avoid confusion or distraction during the day of the exam. The time of giving the question papers should be marked accurately and timely supply of supplementary papers should be ensured.

XV. As far as possible, the examining body should also provide reading material in Braille or E-Text or on computers having suitable screen reading software for open book examination. Similarly online examination should be in accessible format i.e. websites, question papers and all other study material should be accessible as per the international standards laid down in this regard.

XVI. Alternative objective questions in lieu of descriptive questions should be provided for Hearing-Impaired persons, in addition to the existing policy of giving alternative questions in lieu of questions requiring visual inputs, for persons with Visual Impairment.

XVII. As far as possible the examination for persons with disabilities should be held at the ground floor. The examination centres should be accessible for persons with disabilities.

2. It is requested to ensure that the above guidelines are scrupulously followed while conducting examination for persons with benchmark disabilities. All the recruitment agencies, Academics/Examination Bodies etc. under the administrative control of each Ministry/Deapartment may be advised appropriately to ensure compliance of implementing these guidelines. Action taken in this regard may be intimated to this office.

3. The above guidelines are issued with the approval of Hon'ble Minister (Social Justice & Empowerment).

Yours faithfully,

**(D.K. Pannda)**
Under Secretary to the Government of India
Tele. No. 24369059

To

1. Secretary of all Ministries/Department.

2. Secretary, UPSC, Shahjahan Road, New Delhi.

3. Chairman, SSC, Block No.12, CGO Complex, Lodhi Road, New Delhi-110003

4. Chairman, University Grants Commission with a request to issue necessary instructions to all universities including Deemed Universities for compliance.

5. Chairman, Railway Board

6. All National Institutes and RCI under administrative control of Department of Empowerment of Persons with Disabilities (Divyangjan), Ministry of SJ&E, New Delhi

**Copy for information to:** CCPD, Sarojini Bhawan, Bhagwan Dass Road, New Delhi

**APPENDIX- I**

## Certificate regarding physical limitation in an examinee to write

This is to certify that, I have examined Mr/Ms/Mrs ____________ (name of the candidate with disability), a person with ____________ (nature and percentage of disability as mentioned in the certificate of disability), S/o/D/o ____________, a resident of ____________ (Village/District/State) and to state that he/she has physical limitation which hampers his/her writing capabilities owing to his/her disability.

Signature

Chief Medical Officer/Civil Surgeon/ Medical Superintendent of a Government health care institution

Name & Designation.

Name of Government Hospital/Health Care Centre with Seal

Place:

Date:

**Note:**

Certificate should be given by a specialist of the relevant stream/disability (eg. Visual impairment - Ophthalmologist, Lcomotor disability - Prthopaedic specialist/PMR).

**APPENDIX- II**

## Letter of Undertaking for Using Own Scribe

I ______________________, a candidate with ____________ (name of the disability) appearing for the ________________ (name of the examination) bearing Roll No. __________________ at _____________________ (name of the centre) in the District _______________________, ______________ (name of the State). My qualification is ______________.

I do hereby state that ________________ (name of the scribe) will provide the service of scribe/reader/lab assistant for the undersigned for taking the aforesaid examination.

I do hereby undertake that his qualification is ______________. In case, subsequently it is found that his qualification is not as declared by the undersigned and is beyond my qualification, I shall forfeit my right to the post and claims relating thereto.

(Signature of the candidate with Disability)

Place:

Date:

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
[illegible]
आवक क्र. 8825 दि. 30/11/18

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./३८३४/२०१८ दि. ३०/११/२०१८

प्रति,
सर्व विभागप्रमुख,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय: - दिव्यांगांना सोयी व सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही घेणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. वरिष्ठ प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/२०१८/दिव्यांग/इतिवृत्त/विशि दिनांक १७/०९/२०१८
२) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. शिसं/उशि/२०१८/विशि दिनांक २६/१०/२०१८
३) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. युएनआय-२०१८/दिविसो/(१९५/१८)/विशि/१९३०६ दिनांक २८/११/२०१८
४) आस्थापना विभाग पत्र क्र. गो.वि./आस्था/३२२१/२०१८ दिनांक ०५/१०/२०१८

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विद्यापीठातील सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय याचिका क्रमांक १०५/२०१८ व शासन निर्णयानुसार उच्च शिक्षण संस्थामध्ये दिव्यांगांना सोयी व सवलती उपलब्ध करून देण्याबाबत मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयात बैठकी आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सदर बैठकीमध्ये दिव्यांगांना विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये सोयी व सवलती उपलब्ध करून देण्याबाबत निर्देशिलेले आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही घेण्याकरीता उक्त संदर्भिय पत्र क्र. ४ नुसार सर्व विभागांना कळविलेले होते. परंतु अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही घेण्यात आलेली नाही. करीता पुश्नच: सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या विभागाशी संबंधित खालील मुद्यांसंदर्भात तातडीने कार्यवाही घेवुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आस्थापना विभागास लवकरात लवकर सादर करावा.

१. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बैठका घेवुन त्यांना याबाबतची माहिती देणे.
२. दिव्यांगाना वापरता येऊ शकेल व उपलब्ध होईल अशी वेबसाईट तयार करणे.
३. डाटाबेस तयार करणे, निड असेसमेंट करणे, स्वंयसहाय्यता ग्रुप तयार करणे, सुगम्य पुस्तकालय उपलब्ध करून देणे.
४. NVDA Software डाऊनलोड करून घ्यावे.
५. वसतिगृहामध्ये दिव्यांगासाठी रजिस्ट्रर ठेवावे.
६. भौतिक सुविधा तयार करण्याकरीता नियोजन करणे.
७. शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.
८. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे ॲक्सेस ऑडीट करणे.
९. विद्यार्थ्यांचे कृतीसत्र (सेमीनार) आयोजित करणे.
१०. इमारत बांधकाम करतानां कलम ४४ नुसार सुविधा निर्माण करणे व शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे बांधकाम करणे
११. दिव्यांग विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती तयार करणे.
१२. दिव्यांगाकरीता अंदाजपत्रकामध्ये भरीव तरतूद करणे.
१३. ग्रंथालयमाध्ये रिसोर्स सेंटर स्थापन करावे, अनेब्लींग युनिट फॉर डिसेबल स्टुडंट युनिटची स्थापना करून ग्रंथालयामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५-१० संगणक उपलब्ध करून द्यावेत.
१४. विद्यापीठामध्ये Disability सेंटर स्थापन करणे.
१५. शासन निर्णयातील तरतूदीनुसार दिव्यांगांना ५% आरक्षण देणे.

DR(Exam)
30/11/2018

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
प्रभारी कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र:- बैठकीचे इतिवृत्त

**प्रतिलिपी माहितीस्तव अग्रेषित:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

AR / Exam
आवश्यक कार्यवाही करावी.
३०/११/२०१८

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

web-www.dhepune.gov.in E-Mail : vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११५३


क्रमांक.युएनआय-२०१८/दिविसो/(१९५/१८)/विशि /१९३०६ दिनांक.२८.११.२०१८

**न्यायालयीन प्रकरण/तात्काळ/आजच**

प्रति,

कुलसचिव,

सर्व अकृषी विद्यापीठे

**विषय : उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगाना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देणेबाबत...**

विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्रमांक.१०५/२०१८ मध्ये दिनांक.१८.०७.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीचे अनुषंगाने शासन निर्णय दिनांक.२७.०८.२०१८ निर्गमित केलेला असून, सदर शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संचालनालयाचे दि.२९.८.२०१८ चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच याबाबतचा आढावा घेण्यासाठी आत्तापर्यंत तीन बैठका घेण्यात आलेल्या आहेत व त्यामध्ये प्रस्तुत विषयी सविस्तर चर्चाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत विषयी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक.३०.०८.२०१८ चे आदेशान्वये शासन निर्णय दिनांक.२७.०८.२०१८ च्या अंमलबजावणीबाबतचा तिमाही अहवाल पुढील सुनावणीपूर्वी दिनांक.०३.१२.२०१८ पूर्वी सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन आपले विद्यापीठामार्फत केलेल्या वा करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतचा खालील मुद्दयांचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

१.दिव्यांग विद्यार्थ्यांना अडथळा विरहीत वातावरण निर्मितीसाठी/भौतिक सुविधांसाठी आत्तापर्यंत विद्यापीठाने केलेली कार्यवाही उदा. विद्यापीठामध्ये किती इमारती आहेत, त्यामध्ये दिव्यांगांसाठी स्वतंत्र शौचालये आहेत काय?, रॅम्पची सोय आहे का? नसल्यास त्याबाबत काय कार्यवाही सुरु आहे याची सविस्तर माहिती. तसेच विद्यापीठांच्या इमारतींमध्ये दिव्यांगांचा प्रवेश सुलभ आहे किंवा कसे याबाबत दिव्यांग क्षेत्रातील तज्ञाकडून लेखापरिक्षण करुन घेतले आहे का? नसल्यास कधीपर्यंत केले जाईल याची माहिती सादर करावी.

२.शासन निर्णयातील तरतूदीनुसार दिव्यांगांना ५% आरक्षण दिले जात आहे? याबाबतची माहिती.

३.दिव्यांग विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या शैक्षणिक सुविधांबाबतची माहिती- यामध्ये दिव्यांगांना वापरण्यास सुलभ अशी वेब-साईट आहे काय?, नसल्यास कधीपर्यंत उपलब्ध करुन दिली जाईल याची माहिती. सुगम्य ग्रंथालयाची सोय आहे का? दिव्यांगासाठी विकसीत करण्यात आलेली विविध सॉफ्टवेअर विद्यापीठामध्ये उपलब्ध आहेत काय? दिव्यांगांना

शिक्षणामध्ये/अभ्यासक्रम आकलनालमध्ये सुलभ होतील अशा पध्दती विद्यापीठामार्फत विकसित केलेल्या आहेत काय? नसल्यास त्यासाठी काय उपाययोजना केलेल्या आहेत वा भविष्यात करण्यात येणार आहेत याची माहिती.

वरील मुद्यांबाबतची माहिती आजच ५.०० वाजेपर्यंत संचालनालयास सादर करावी.

तसेच प्रस्तुत विषयी दिनांक.२६.११.२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडलेले असून, इतिवृत्तामध्ये नमूद केलेल्या बाबींवर आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब संचालनालयास सादर करावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**दिव्यांगांना महाविद्यालयामध्ये/विद्यापीठांमध्ये सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे येथे दिनांक २६.११.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आलेल्या बैठकीचे कार्यवृत्त.**

सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग/कार्यकारी अभियंता/विद्यापीठ अभियंता/उपकुलसचिव (स्थापत्य) व संचालक, विद्यार्थी विकास यांची मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली व डॉ.श्रीमती वैशाली कोल्हे, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांचे उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस उपस्थित असणाऱ्या अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली वगळता सर्व विद्यापीठांचे अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

सुरुवातीस उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात झाली.

मा. उच्च न्यायालयात दाखल असलेली जनहित याचिका क्र.१०५/२०१८ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार व शासन निर्णय दि.२७ ऑगस्ट २०१८ मधील निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये/विद्यापीठांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना कॉमनरुम, कॅन्टीन, ऑडीटोरीयम, रॅम्प, ग्रंथालय सुविधा, शैक्षणिक सुविधा, पुस्तके, शौचालय इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने व दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा, २०१६ ची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने दिनांक १५.९.२०१८ रोजी बैठक घेण्यात आली होती व सदर बैठकीत यासर्व बाबीवर सविस्तर चर्चा होऊन त्याची अंमलबजावणी करणेबाबत सूचना दिलेल्या होत्या, त्यानंतर २६.१०.२०१८ रोजी आढावा बैठक घेण्यात आली व विद्यापीठांनी केलेल्या कामाच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबत आढावा घेण्यात आला होता. त्यानुषंगाने विद्यापीठांनी आत्तापर्यंत केलेल्या कार्यवाहीबाबतचा आढावा सुरुवातीस घेण्यात आला. त्यानुसार ब-याच विद्यापीठांनी प्राचार्यांच्या बैठका घेतलेल्या आहेत. ३ डिसेंबर पर्यंत अहवाल कोर्टात सादर करावयाचा असल्याने ज्या विद्यापीठांनी बैठका घेतल्या नाहीत, त्यांनी तात्काळ बैठका घेऊन दोन दिवसात संचालनालयास माहिती प्राप्त करुन द्यावी असे मा.संचालकांनी निर्देश दिले.

१. सर्व विद्यापीठाच्या व्यवस्थापक, मालमत्ता विभाग/कार्यकारी अभियंता/विद्यापीठ अभियंता/उपकुलसचिव (स्थापत्य) यांनी विद्यापीठाच्या अधिनस्त असणा-या सर्व संलग्नित शासकीय व अशासकीय महाविद्यालयातील प्राचार्यांची बैठक घेऊन अहवाल आजच्या बैठकीत सादर करणेबाबत मागील बैठकीत सांगितले होते, ब-याच विद्यापीठांनी बैठका घेतल्या, परंतु ज्या विद्यापीठांनी बैठका घेतल्या नाही त्या विद्यापीठांनी प्राचार्यांच्या तात्काळ बैठका आयोजित करुन दोन दिवसात अहवाल पाठविण्याबाबत निर्देश दिले.

२. स्वयंसेवक/ दिव्यांग विद्यार्थ्यांची बैठक घेऊन स्वयंसेवकांना आवश्यक माहिती देऊन दिव्यांगांना महाविद्यालय/विद्यापीठांमध्ये आवश्यक ती मदत करण्यासाठी उद्युक्त करणेबाबत सूचना दिल्या होत्या. याबाबतही माहिती त्वरित सादर करणेबाबत निर्देश दिले.

३. विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयाचे ॲक्सेस ऑडीटबाबत काय तयारी केली यांची सर्वांनी माहिती देण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

४. सर्व विद्यापीठांनी समान संधी सेल तयार करुन माहिती देण्याबाबत सूचना दिल्या.

५. अंदाजपत्रकात तरतूद - याबाबत सर्व विद्यापीठांनी त्यांच्या एकूण अंदाजपत्रकात तरतूदीपैकी ३ टक्के तरतूद दिव्यांगांसाठी ठेवण्याबाबत सूचना दिल्या.

६. दिव्यांगांना भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नियोजन करणे/शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणेबाबत- कार्यवाही सुरु असल्याचे सर्व विद्यापीठांनी सांगितले.

श्री.काळे, व्यवस्थापक, मालकत्ता विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व श्री.एस.आर.पाटील, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी, जळगांव विद्यापीठ, जळगांव यांनी सर्व विद्यापीठांकडे पाठपुरावा करुन माहिती घेऊन २५० महाविद्यालयाची एकत्रित माहिती डॉ.श्रीम.कोल्हे यांच्याकडे सादर केलेली आहे. परंतु २९४० महाविद्यालयापैकी फक्त २५० महाविद्यालयाची माहिती प्राप्त झाल्याबाबत संचालकांनी नाराजी व्यक्त केली. प्रत्येक विद्यापीठाने स्वत: जबाबदारीने काम करण्याबाबत संचालकांनी सूचना दिल्या.

तसेच डॉ.श्रीम.कोल्हे,प्रो.आय ॲक्सेस राईटस मिशन, फिल्ड ॲक्शन, प्रोजेक्ट सेंटर फॉर डिसेब्लिटी स्टडीज, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस यांना विद्यापीठामध्ये आमंत्रित करुन दिव्यांग विद्यार्थी व प्राचार्यांची कार्यशाळा/बैठक आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच I Access rights mission ची Call for Action disability गाईडलाईन्स डॉ.श्रीम.कोल्हे यांनी सर्व विद्यापीठांना पाठविलेल्या आहेत, त्यानुसार आपण पुढील कार्यवाही करण्याबाबत श्रीम.कोल्हे मॅडम यांनी सूचना दिल्या.

- ॲक्सेस ऑडिटबाबत डॉ.श्रीम.कोल्हे, प्रोजेक्ट डायरेक्टर,टीस,मुंबई यांनी सादरीकरणाव्दारे सविस्तर माहिती देवून संबंधितांच्या अडचणी विचारुन त्याचे निरसन केले.
- ऑर्डिनस तयार करण्याची श्री.एस.आर.पाटील, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी, जळगांव विद्यापीठ, जळगांव यांचेकडे जबाबदारी दिली होती, ८० टक्के मसुदा तयार झाला असल्याचे श्री.पाटील यांनी सांगितले.
- सर्व विद्यापीठांनी सेल्फ रिपोर्ट सादर केला असल्याने सांगितले. विद्यापीठनिहाय रिपोर्ट सादर करण्याबाबत संचालकांनी निर्देश दिले.
- डॉ.श्रीम.कोल्हे यांनी दिलेल्या ५२ मुद्याची माहिती सादर करण्याबाबत मागील बैठकीत सांगितले होते, परंतु नागपूर व रामटेक विद्यापीठाची माहिती अजूनही अप्राप्त आहे.
- समान संधी सेल तयार करण्याबाबत डॉ.श्रीम.कोल्हे यांनी मार्गदर्शन केले.
- दिव्यांनांची सर्व विद्यापीठांनी यादी करावी, दिव्यांग किती, कुठल्या प्रकारात मोडतात, किती टक्के दिव्यांग आहेत याची यादी करुन सादर करणेबाबत मा.संचालकांनी सूचना दिल्या.
- प्रत्येक विद्यापीठामध्ये Disability सेंटर स्थापन करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.
- सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांनी ३ डिसेंबर २०१८ रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याचे ठरले.
- दिव्यांगांना ॲकेडेमिक सोयी-सुविधा देण्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेण्याची सर्व जबाबदारी ही श्री. प्रफुल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे सोपविण्यात येत असल्याचे मा.संचालकांनी सांगितले.

यानंतर डॉ.श्रीम.कोल्हे यांनी सादरीकरणाद्वारे खालीलप्रमाणे माहिती दिली.

- डाटाबेस तयार करणे, निड असेसमेंट करणे आवश्यक आहे, स्वयंसहाय्यताग्रूप तयार करणे, सुगम्य पुस्तकालय उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात आल्या.
- श्री.काळे, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व श्री.एस.आर.पाटील, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी, जळगांव विद्यापीठ,जळगांव यांनी सर्व विद्यापीठांकडे पाठपुरावा करुन एकत्रित माहिती घेऊन अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.
- दिव्यांग व्यक्तीसाठी माईक सिस्टीम ठेवावी.
- सिक्युरीटी गार्डच्या जवळ दिव्यांगासाठी एक मदतनीस ठेवावा.
- शिक्षकांना ट्रेनिंग द्यावे लागेल, दिव्यांग मुलांना नोटस आधी द्याव्यात.
- प्रत्येक महाविद्यालयामध्ये ५०-६० स्वयंसहायक असावेत.
- सुगम्य पुस्तकालयामध्ये सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत.
- प्रत्येक ग्रंथालयामध्ये रिसोर्स सेंटर स्थापन करावे,अनेबल युनिटची स्थापना करावी.
- रॅम्प बाबत गाईडलाईन पाठविली आहे, दिलेल्या नियमाप्रमाणेच रॅम्प बांधणे आवश्यक आहे.
- वसतिगृहामध्ये दिव्यांगासाठी रजिस्ट्रर ठेवावे.
- NVDA Software डाऊनलोड करुन घ्यावे.
- TISS व I Access मिशन सोबत करावयाच्या MOU चा मसुदा डॉ.श्रीम.कोल्हे यांनी त्यांच्या संस्थेमार्फत संचालनालयास सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले.
- I Access Rights Mission च्या डॉ.श्रीम. वैशाली कोल्हे यांनी TISS येथे दिनांक.१६.१२.२०१८ रोजी डिसेब्लीटी, ॲक्सेसिबिलीटी, इन्क्ल्युजन ॲण्ड वेल बिईंग याबद्दल एक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात यावी व त्यामध्ये प्रत्येक विद्यापीठाने उपस्थित राहून त्यांच्या विद्यापीठामध्ये सदर विषयी आत्तापर्यंत झालेल्या वा करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती द्यावी असे सांगितले. सदर परिषदेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव श्रीम.कोल्हे या संचालनालयास सादर करणार असून, शासनाच्या मान्यतेनंतर सदरची परिषद TISS मुंबई येथे घेण्यात येईल.

आत्तापर्यंत झालेल्या तीनही बैठकींचे अनुषंगाने व मा.संचालक यांनी बैठकीमध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे प्रत्येक विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल दोन दिवसात संचालनालयास सादर करावा, त्या अहवालावर कोर्टात रिपोर्ट सादर करावयाचा असल्याबाबत श्री.दुसाने, प्रशासन अधिकारी यांनी सांगितले व बैठक समाप्त करण्यात आली.

संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षण संचालनाल
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११

17 SEP 2018

जावक क्रमांक. 1643
शाखा-

महाराष्ट्र शासन

# उच्च शिक्षण संचालनालय

मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

web:www.dhepune.gov.in. E-Mail director.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२/२६१३०६२७/२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३
कमांक उशिसं/२०१८/दिव्यांग/इतिवृत्त/विशी दिनांक - १७/९/२०१८

प्रति,

मा. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,

**विषय :- दिव्यांगाच्या सोईसुविधाबाबतच्या बैठकीचे इतिवृत्तानुसार कार्यवाही करण्याबाबत**

उपरोक्त विषयानुषंगाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी १२.०० उच्च शिक्षण संचालनालयात बैठक घेण्यात आलेली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले. इतिवृत्तामध्ये नमुद केलेल्या बाबीवर आवश्यक ती कार्यवाही तातडीने करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास विनाविलंब सादर करावा.

(हरिभाऊ शिंदे)
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**दिनांक १५.९.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. संचालक यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विद्यापीठे व सलंग्नीत शासकीय व अशासकीय महाविद्यालयांनी दिव्यांग विद्यार्थीना सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यावावत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

सदर बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची यादी स्वतंत्रपणे जोडली आहे.

सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. मा. उच्च न्यायालयात दाखल असलेली जनहित याचिका क्र. १०५/१८ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार व शासन निर्णय दि. २७ ऑगस्ट, २०१८ मधील निर्देशानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना कॉमनरुम, कॅन्टीन, ऑडीटोरीयम, रॅम्प, ग्रंथालय सुविधा, शैक्षणिक सुविधा, पुस्तके, शौचालय इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने व दिव्यांग व्यक्तीचे अधिकार कायदा, २०१६ अन्वये अमंलबजावणी करण्याच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा झाली.

मुंबई व नागपूर व इतर ठिकाणी हेरीटेज बिल्डींग इमारती आहेत तेथे मुळ इमारतीत /हेरीटेजमध्ये बदल न करता लाकडी रॅम्प तयार करुन दिव्यांगाना सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत मा. संचालक महोदयांनी निर्देशित केले.

कलम ४४ नुसार विद्यापीठे, शासकीय कार्यालये, संलग्नीत शासकीय व अशासकीय महाविद्यालये येथे केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक आहे अन्यथा संबंधिताना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यात येऊ नये. प्रस्तुत प्रकरणी तीन महिन्यांच्या आंत उच्च न्यायालयास अंतिम अहवाल सादर करावयाचा आहे. त्याअनुषंगाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ नंतर पुढील बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले.

श्री. काळे, व्यवस्थापक, मालमत्ता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी सर्व विद्यापीठाकडे पाठपुरावा करुन उपलब्ध इमारती, विद्यार्थी रॅम्प सुविधा, व्यवस्था तपासुन एकत्रित अहवाल सादर करावा असे निर्देश संबंधितांना देण्यात आले. सदर कामासाठी श्री. काळे, मालमत्ता व्यवस्थापक यांना नोडल ऑफिसर व श्री. एस. आर. पाटील, कवयत्री बहीणाबाई चौधरी जळगांव विद्यापीठ, जळगांव यांनी एकत्रितपणे काम करण्याबाबत निर्देशित केले.

सर्व विद्यापीठाच्या मालमत्ता व्यवस्थापक (इस्टेट मॅनेजर) यांनी विद्यापीठाच्या अधिनस्त असणा-या सर्व सलंग्नीत शासकीय व अशासकीय महाविद्यालयातील प्राचार्याची बैठक घेऊन दिव्यांगाबाबतच्या सोईसुविधा, इत्यादीची माहिती महाविद्यालयाकडून घेऊन त्यांचा एकत्रित अहवाल दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ च्या पुढील बैठकीत सादर करावा.

सर्व विद्यापीठानी त्यांच्या वार्षिक अदांजपत्रकात दिव्यांगासाठी सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष तरतुद करावी असेही सर्वाना निर्देशित करण्यात आले.

सर्व विद्यापीठातील उपलब्ध इमारती व सोईसुविधाचा आढावा घेण्यात आला. कलम ४४ नुसार केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे बांधकाम करुन व दिव्यांगाना वापरता येतील अशा आवश्यक सोईसुविधा विद्यापीठ व सलंग्नीत महाविद्यालयामध्ये अडीच महिन्याच्या आंत उपलब्ध करुन देण्याचे निर्देश सर्वाना दिले.

जनहित याचिका क्र.१०५/१८ मध्ये १. दिव्यांगांना सेवेत ५ टक्के आरक्षण, २. कलम ४४ नुसार इमारतीमध्ये शौचालयांची निर्धारीत व्यवस्था, विद्युतपाळणा (लिफ्ट), ३. अभ्यासक्रमाची क्रमीक पुस्तके, ४. तज्ञ शिक्षक व संगणक सुविधा, दृकश्राव्य माध्यमाची सुविधा याबाबत मागणी करण्यात आली होती. अंपगाच्या संवर्गात २१ प्रकारच्या अंपगांचा समावेश आहे. समान संधी सेल स्थापन करणे व उपरोक्त बाबीची कालमर्यादेत पूर्तता करुन तीन महिन्यात न्यायालयामध्ये अहवाल सादर करावयाचा आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७३ (८) नुसार समान संधी सेलची स्थापना करण्यात यावी. समान संधी सेलमध्ये कुलगूरु वा कुलसचिव याचा समावेश असेल. तसेच सदर सेलमध्ये दिव्यांग विद्यार्थी सदस्य असतील. सदर सेल दिव्यांग विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोईसुविधाबावत ढाचा ठरवेल. त्यामध्ये महाविद्यालयात प्रवेश, परीक्षा, दिव्यांगासाठी वेबसाईट तयार करणे. दिव्यांगाचा डाटा बेस तयार करणे. ॲक्सेस ऑडीट करणे. ग्रंथालय उपलब्ध असणे, क्षेत्रावर काम करणारे स्वंयसेवक, दिव्यांग आणि त्यांना

उपलब्ध सुविधाची माहिती देणारी समिती, अभ्यासक्रमाची उपलब्धता, सर्व स्तरावर सुविधा असाव्यात व प्रशिक्षीत मनुष्यबळ उपलब्ध असावे. विद्यार्थ्यांना उपयोगी पडणाऱ्या सुविधा असाव्यात.

दिव्यांगाना सोईसुविधा मिळण्याकरीता कृती आराखडा/योजना तयार करण्याचे ठरले. त्यामध्ये खालील बाबीचा समावेश करण्यात आला.

१. सर्व संबंधित शिक्षकांच्या बैठका घेऊन त्यांना याबाबतची माहिती देणे.
२. स्वंयसेवकाची बैठक घेउन त्यांना आवश्यक माहिती देउन कामासाठी उद्युक्त करणे.
३. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बैठका घेऊन उपलब्ध योजनांची माहिती देणे.
४. दिव्यांगाना वापरता येऊ शकेल व उपलब्ध होईल अशी वेबसाईट तयार करणे.
५. समान संधी सेल तयार करणे.
६. भौतिक सुविधा तयार करण्याकरीता नियोजन करणे.
७. शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.
८. विद्यापीठे व सलंग्नीत महाविद्यालयाचे ॲक्सेस ऑडीट करणे.
९. विद्यार्थ्यांचे कृतीसत्र (सेमीनार) आयोजित करणे.
१०. इमारत बांधकाम करताना कलम ४४ नुसार सुविधा निर्माण करणे.
११. दिव्यांग विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती तयार करणे.
१२. सर्व विद्यापीठानी त्यांच्या अंदाजपत्रक भरीव तरतूद करावी.

वर नमूद केलेल्या सर्व बाबीची पूर्तता एक खास मिशन म्हणुन दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ पूर्वी पुर्ण करण्यात यावे. सदर बाबीचा आढावा १५ ऑक्टोबर, २०१८ वा तदनंतर घेण्यात येईल. सदर बैठकीमध्ये सर्व विद्यापीठानी त्यांचा अहवाल सादर करावा.

सर्व विद्यापीठे व टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांच्यामध्ये दिव्यांगाना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोई सवलती व त्यांची तपासणी याबाबत सामंजस्य करार (MOU) करण्याबाबत निश्चित करण्यात आले. तसेच सदर सामंजस्य करार करण्यासाठी विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७३ (८) प्रमाणे ऑर्डीनन्स बनविण्याचा मसुदा श्री. एस आर पाटील, कुलसचिव, कवयत्री बहीणाबाई चौधरी जळगांव विद्यापीठ, जळगांव यांनी करण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले. सामंजस्य कराराचा मसुदा तयार करण्यासाठी श्री. वैशाली कोल्हे , टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांना जबाबदारी देण्यात आली.

सर्व विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालये यांनी ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याचे ठरले.

तदनंतर सर्वाचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

*-*-*-*-*-*

(डॉ. धनराज माने)
संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्रमांक शिसं/उशि/२०१८/विशि दिनांक –२६.१०.२०१८

**दिनांक २६.१०.२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता दिव्यांग विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये/ विद्यापीठांमध्ये सोईसुविधा उपलब्ध करुन देणेबाबत घेण्यात आलेल्या बैठकीचे कार्यवृत्त.**

सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग यांची मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली व डॉ.श्रीमती वैशाली कोल्हे, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स,मुंबई यांचे उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस उपस्थित असणारे अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्व विद्यापीठातील अधिकारी बैठकीस उपस्थित होते परंतु गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली व संस्कृत विद्यापीठ, रामटेक या विद्यापीठाचे कुणीही अधिकारी बैठकीस उपस्थित नव्हते,याबददल संचालकांनी नाराजी व्यक्त केली.

सुरुवातीस उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात झाली.

मा. उच्च न्यायालयात दाखल असलेली जनहित याचिका क्र.१०५/२०१८ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार व शासन निर्णय दि. २७ ऑगस्ट २०१८ मधील निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये/विद्यापीठांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना कॉमनरुम, कॅन्टीन, ऑडीटोरीयम, रॅम्प, ग्रंथालय सुविधा, शैक्षणिक सुविधा, पुस्तके, शौचालय इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने व दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा, २०१६ ची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने दिनांक १५.९.२०१८ रोजी बैठक घेण्यात आली होती व सदर बैठकीत यासर्व बाबीवर सविस्तर चर्चा होऊन त्याची अंमलबजावणी करणेबाबत सूचना दिलेल्या होत्या, त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेण्यासाठी आजची बैठक आयोजित केलेली होती.

सुरुवातीस मागील बैठकीत दिव्यांगांना सोईसुविधा मिळण्याकरिता कृती आराखडा तयार करण्यात आला त्यावर काय कारवाई केली याबाबत विद्यापीठ निहाय माहिती घेण्यात आली.

नागपूर विद्यापीठाने अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांची बैठक घेतली ४५ पैकी ४० महाविद्यालयांची माहिती मिळाली.

कोल्हापूर विद्यापीठाने प्राचार्यांची बैठक घेतली,५० टक्के माहिती प्राप्त झाली.

१. सर्व विद्यापीठाच्या मालमत्ता व्यवस्थापक (इस्टेट मॅनेजर) यांनी विद्यापीठाच्या अधिनस्त असणा-या सर्व संलग्नित शासकीय व अशासकीय महाविद्यालयातील प्राचार्यांची बैठक घेऊन अहवाल आजच्या बैठकीत सादर करणेबाबत मागील बैठकीत सांगितले होते, परंतु दोन-तीन विद्यापीठ वगळता बाकी विद्यापीठांनी प्राचार्यांची बैठक घेतलेली दिसून येत नाही,

याबाबत संचालकांनी नाराजी व्यक्त करुन सर्व विद्यापीठांनी प्राचार्यांच्या तात्काळ बैठका आयोजित करण्याबाबत निर्देश दिले.

२. स्वयंसेवक/ दिव्यांग विद्यार्थ्यांची बैठक घेऊन स्वयंसेवकांना आवश्यक माहिती देऊन कामासाठी उद्युक्त करावे तसेच दिव्यांगांना उपलब्ध योजनांची माहिती देणेबाबत मागील बैठकीत सूचना दिलेल्या होत्या, परंतु विद्यापीठांनी सदर बैठका घेतलेल्या नाहीत, तेव्हा याबाबतही तात्काळ बैठक घेऊन माहिती पुढील बैठकीत सादर करण्याबाबत संचालकांनी निर्देश दिले.

३. दिव्यांगासाठी वेबसाईट तयार करणे- वेबसाईट तयार करणेबाबत काम सुरु आहे असे सर्व विद्यापीठांनी सांगितले.

४. समान संधी सेल तयार करणे- याबाबत सर्व विद्यापीठांनी समान संधी सेल तयार करुन माहिती पुढील बैठकीत देण्याबाबत सूचना दिल्या.

५. दिव्यांगांना भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नियोजन करणे/शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणेबाबत- कार्यवाही सुरु असल्याचे सर्व विद्यापीठांनी सांगितले.

६. विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयाचे अॅक्सेस ऑडीट करणे-अॅक्सेस ऑडिटसाठी तज्ञ व्यक्ती नेमण्याबाबत डॉ.श्रीम.कोल्हे मॅडम यांचे मार्गदर्शन घेण्याबाबत संचालकांनी सूचित केले.

७. इमारत बांधकाम करतांना कलम ४४ नुसार भौतिक सुविधा निर्माण करणे- सध्या उपलब्ध आहे त्या इमारतीमध्ये सोईसुविधा निर्माण करण्याबाबत निर्देश दिले. तसेच ज्या विद्यापीठांमध्ये सदर सुविधा उपलब्ध नाही त्यांनी त्या त्वरित उपलबध करुन द्याव्यात. तसेच कलम-४४ नुसार इमारतीचे बांधकाम केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे असणे आवश्यक आहे तसे सर्व विद्यापीठांनी नवीन इमारतीचे बांधकाम करुन घेण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

८. अंदाजपत्रकात तरतूद - याबाबत सर्व विद्यापीठांनी त्यांच्या एकूण अंदाजपत्रकात तरतूदीपैकी ३ टक्के तरतूद दिव्यांगांसाठी ठेवण्याबाबत सूचना दिल्या. सर्वांनी प्रस्ताव पाठवावा, त्याप्रमाणे तरतूद उपलब्ध करुन देता येईल असे ठरले.

मागील बैठकीत दिलेल्या प्राथमिक स्वरुपाची सुध्दा माहिती विद्यापीठाकडून उपलब्ध झाली नसून दिलेल्या सूचनांनुसार कोणतीही कार्यवाही झाली नसल्याबाबत संचालकांनी नाराजी व्यक्त केली.

श्री.काळे, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व श्री.एस.आर.पाटील, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी, जळगांव विद्यापीठ, जळगांव यांनी सर्व विद्यापीठांकडे पाठपुरावा करुन माहिती घेऊन एकत्रित अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

तसेच डॉ.श्रीम.कोल्हे,प्रो.आय अॅक्सेस राईटस मिशन, फिल्ड अॅक्शन, प्रोजेक्ट सेंटर

फॉर डिसेब्लिटी स्टडीज,टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस यांना विद्यापीठामध्ये आमंत्रित करुन दिव्यांग विद्यार्थी व प्राचार्यांची कार्यशाळा/बैठक आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच I Access ची Call for Action disability गाईडलाईन्स डॉ.श्रीम.कोल्हे या सर्व विद्यापीठांना ईमलव्दारे पाठविणार आहेत. या गाईडलाईन्सचा दिव्यांगांबाबतचे भविष्यातील धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेमध्ये वापर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

- ॲक्सेस ऑडिटबाबत श्रीमती वैशाली कोल्हे, प्रोजेक्ट डायरेक्टर,टीस,मुंबई यांनी सादरीकरणाव्दारे सविस्तर माहिती देवून संबंधितांच्या अडचणी सोडविल्या.
- ॲक्सेस ऑडिटचे सादरीकरणाची माहिती श्री.काळे, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी सर्वांना पाठविण्याबाबत सूचना दिल्या.
- अनेब्लींग युनिट फॉर डिसेबल स्टुडंट युनिटची स्थापना करुन ग्रंथालयामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५-१० संगणक उपलब्ध करुन द्यावेत.
- डाटाबेस तयार करणे, निड असेसमेंट करणे आवश्यक आहे, स्वयंसहाय्यताग्रूप तयार करणे, सुगम्य पुस्तकालय उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात आल्या.
- श्री.काळे, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व श्री.एस.आर.पाटील, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी जळगांव विद्यापीठ,जळगांव यांनी सर्व विद्यापीठांकडे पाठपुरावा करुन एकत्रित माहिती घेऊन अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.
- डॉ.श्रीम.कोल्हे या सर्व विद्यापीठामध्ये स्वत: भेट देऊन दिव्यांग विद्यार्थी व महाविद्यालयातील प्राचार्य यांचेशी संपर्क साधणार असल्याचे ठरले.
- प्रत्येक विद्यापीठामध्ये disability सेंटर स्थापन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.
- यापुढे होणा-या प्रत्येक बैठकीत संचालक, विद्यार्थी विकास यांना बोलविण्याबाबत ठरले.
- TISS व I Access मिशन सोबत करावयाच्या MOU चा मसुदा डॉ.श्रीम.कोल्हे यांनी त्यांच्या संस्थेमार्फत संचालनालयास सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले.

- पुढील बैठक १४ ते १६ नोव्हेंबर २०१८ दरम्यान टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स,मुंबई येथे घेण्याबाबत ठरले

- सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांनी ३ डिसेंबर २०१८ रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याचे ठरले व बैठक समाप्त करण्यात आली.

संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे.